**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ०८/२०१४ मधील निशाणी क्रमांक ६०**
**वरील आदेश**
**कौष्याल्याबाई व इतर २ विरुध्द वामनराव इतर ४**
**(CNR NO. MHLA13000372014)**

प्रतिवादी क्रमांक ५ ने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन त्याने उशीराने दाखल केलेली कैफियत प्रकरणात दाखल करुन घ्यावी अशी विनंती केलेली आहे.

२. वादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दिले व अर्जास आक्षेप घेतला.

३. प्रतिवादीचे विद्वान विधीज्ञ श्री.ए.जी.दबडगावकर व वादीचे विद्वान विधीज्ञ श्री.आर.टी.कांबळे यांचा युक्तीवाद ऐकला.

४. संचिकेची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्रमांक ५ यांना दिनांक ०४–०३–२०२१ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झालेले आहे व ते दिनांक ०९–४–२०२१ रोजी वकीलामार्फत प्रकरणामध्ये हजर झालेले आहे. प्रतिवादीने दिनांक ०९–४–२०२१ रोजी अर्ज दाखल करुन त्याला कैफियत दाखल करण्यसाठी वेळ द्यावा अशी विनंती केलेली आहे तो अर्ज मंजुर करण्यात आलेला आहे. तथापी त्यानंतर प्रतिवादी क्रमांक ५ केवळ आजरोजी हजर झाला व प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादीचे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने कैफियतीची नक्कल स्वीकारलेली आहे आणि या प्रतिवादी क्रमांक ५ विरुध्द अद्याप विना कैफियत दावा पुढे चालेल अशा आशयाचे आदेश पारीत झालेले नाहीत. त्यामुळे या बाबींचा विचार करुन योग्य तो आदेश पारीत करावा.

५. प्रस्तुतचा दावा हा वाटनीचा व स्वतंत्र ताबा मिळणेबाबत दाखल करण्यात आलेला आहे. दावा ज्या मिळकतीच्या संदर्भाने दाखल केलेला आहे त्या मिळकतीचे स्वरुप आणि त्याचबरोबर या प्रतिवादी क्रमांक ५ चे सदर मिळकतीमध्ये असलेले हितसंबध याचा विचार करता अर्जदारास लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य होईल. तथापी, प्रतिवादी क्रमांक ५ यांच्या कृत्यामुळे झालेला विलंबसुध्दा दुर्लक्षुण चालणार नाही. कैफियतीची नक्कल जरी वादीने स्वीकारलेली असली आणि या प्रतिवादी क्रमांक ५ विरुध्द जरी विना कैफियत आदेश पारीत झाले नसले तरी या प्रतिवादी क्रमांक ५ ने वेळेत कैफियत न दाखल करण्याच्या कृत्यामुळे प्रकरणास विलंब झालेला आहे सबब प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक ५ हा खर्च भरण्यास बांधील आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज पुढीलप्रमाणे मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्रमांक ४ यांनी दाखल केलेली कैफियत प्रतिवादीने न्यायालयामध्ये रुपये ३००/– एवढी रक्कम भरल्यानंतर पटलावरती घेण्यात यावी. प्रतिवादी क्रमांक ४ यांनी भरलेली रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAMAKANT BHAGOJIRAO HANWATE
Date: 2022.02.21 17:52:20 +0530

दिनांक २१.०२.२०२२
स्थळ रेणापूर

(रमाकांत बी.हनवते)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर रेणापूर